# महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण -२०२३/प्र.क्र.४४७/सेवा-५,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : ०२.०१.२०२४

प्रति,

१. आयुक्त तथा अभियान संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.

२. संचालक आरोग्य सेवा
आरोग्य सेवा आयुक्तालय,पुणे.

विषय:- आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त औषध निर्माण अधिकारी संवर्गास पदोन्नती संधी उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र. सआंसे/आस्था/कक्ष५३ अ/औनिअ/पदोन्नती /२०२३/४१४८-४९/
दि. १३.०४.२०२३

आपल्या संदर्भाधीन अहवालानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त औषध निर्माण अधिकारी संवर्गास पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषद अधिनस्त आरोग्य सेवेतील औषधनिर्माण अधिकारी संवर्ग आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त घेऊन या संवर्गाचे एकत्रीकरण करुन पदोन्नती स्तर निश्चित करण्याबाबत विभागाने प्रस्तावित केले होते. त्यावर मा. मंत्री (सा.आ.) यांनी संलग्न पत्रानुसार ग्रामविकास विभाग व इतर विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व पदांच्या अनुषंगाने प्रशासकीय सुसुत्रता व आरोग्य सेवेचे बळकटीकरणासाठी सर्व पदे आरोग्य विभागाच्या एकछत्री अंमलाखाली असणे आवश्यक आहे व यासाठी तपशिलवार माहितीस्तव धोरणात्मक निर्णयासाठी मंत्रीमंडळाचे निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशित केले आहे.

प्राथमिक माहितीनुसार ग्रामविकास विभागाकडे कार्यरत असलेले आरोग्य सेवेच्या कर्मचाऱ्यांची उपलब्ध माहितीचा तक्ता सोबत जोडत आहे.

सदर माहिती प्रमाणित करुन सर्व पदांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णयासाठी तपशिलवार माहिती व अभिप्राय स्वतंत्रपणे नमुद करुन प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेने सादर करावा.

२. **यादरम्यान विभागाच्या अधिनस्त औषधनिर्माण अधिकारी यांची पदश्रृंखला व पदोन्नती प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे पदोन्नती साखळी व सेवाप्रवेश नियम करण्याबाबतची मागणी दि.३०.११.२०२३ च्या पत्रान्वये शासन मान्यताप्राप्त शासकीय औषध निर्माता गट क कर्मचारी संघटनेने केलेली आहे.**

समितीने दि. १६.१२.२०२२ रोजी सादर केलेल्या अहवाल/ शिफारशीनुसार संघटनेच्या मागणीप्रमाणे सदर प्रकरणी स्वतंत्रपणे कार्यवाही करावी किंवा कसे याबाबत तात्काळ अभिप्राय शासनास सादर करावे जेणेकरुन सदर प्रस्तावावर विहीत कार्यपध्दतीने मान्यता घेऊन सेवा प्रवेश नियम अधिसूचीत करणे शक्य होईल.

मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करावा. व मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने तात्काळ अभिप्राय सादर करावे.

Archana

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :

१. शासकीय औषध निर्माता गट क कर्मचारी संघटना प्रतिनिधी

**विषय:- ग्राम विकास विभागाकडे आरोग्य विभागाशी संबंधित कार्यरत पदे.**

- मुंबई व मुंबई उपनगर वगळता राज्यातील उर्वरित ३४ जिल्हा परिषदांमध्ये खालीलप्रमाणे आरोग्य विभागासंबंधित नियमित कर्मचारी संख्या मंजूर आहे. सदर पदे आरोग्य विभागाच्या आकृतिबंधातील पदे असून जिल्हा परिषदेकडे कार्यरत आहेत. गट-क व ड पदांच्या वेतनासाठी आरोग्य विभागाच्या अर्थसंकल्पित निधीतून वेतनासाठी जिल्हा परिषदेला अनुदान देण्यात येते.

| पदनाम | संवर्ग | पदस्थापना | मंजूर पदे | नियुक्ती स्तर |
|---|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी | गट-अ | प्रा.आ.कें. | ३७२१ | शासन |
| वैद्यकीय अधिकारी | गट-ब * | प्रा.आ.कें. | ३२७ | शासन |

* वैद्यकीय अधिकारी, गट-ब ची पदे ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांत आहेत.

गट-क व ड

| पदनाम | संवर्ग | पदस्थापना | मंजूर पदे | नियुक्ती स्तर |
|---|---|---|---|---|
| आरोग्य सेविका/एएनएम | गट-क | उपकेंद्र | १४३७१ | मु.का.अ., जि.प. |
| | | प्रा.आ.कें. | २९९१ | मु.का.अ., जि.प. |
| | | एकूण | **१७३६२** | |
| आरोग्य सेवक (पुरुष) | गट-क | उपकेंद्र | **१३८५२** | मु.का.अ., जि.प. |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | गट-क | प्रा.आ.कें. | **२०१०** | मु.का.अ., जि.प. |
| औषध निर्माण अधिकारी | गट-क | प्रा.आ.कें. | **१८८२** | मु.का.अ., जि.प. |
| आरोग्य सहाय्यक (पुरुष) | गट-क | प्रा.आ.कें. | **३८३८** | मु.का.अ., जि.प. |
| आरोग्य पर्यवेक्षक | गट-क | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती (जि.प.) | **६४२** | मु.का.अ., जि.प. |
| एल.एच.व्ही. | | | **२५९०** | मु.का.अ., जि.प. |
| सार्वजनिक आरोग्य परिचारिका | गट-क | जिल्हा आरोग्य अधिकारी कार्या., जि.प. | **६८** | आयुक्त, आरोग्य सेवा/उपसंचालक (शुश्रृषा) |
| अंशकालीन स्त्री परिचर (मानधन तत्वावर) | मानधन तत्वावर | उपकेंद्र | **१०७९२** | मु.का.अ., जि.प. |
| **गट-क व ड एकूण** | | | **५३०३६** | |